**गुन्हे शाखा युनिट क्रं. ०१ कार्यालय ,पोलीस आयुक्तालय अमरावती शहर**
**४४४६०१ दुरध्वनी क्रंमाक ०७२१ - २५५०१८१**
**ई मेल - crime branch.cpamp@mahapolice.gov.in**
**प्रेस नोट ०५.०१.२०२५**

# गुन्हे शाखा युनिट क्रं. ०१ अमरावती शहर यांचेकडून दोन आरोपीताना गुटखा व सुगंधीत तंबाखूच्या बोलेरो वाहनासह ताब्यात घेवून 12,05,396 रु चा मुददेमाल जप्त केल्याबाबत

गुन्हे शाखा युनीट क्रं. ०१ चे पोलीस अधिकारी व अमलदार हे पोलीस स्टेशन राजापेठ हददीमध्ये पेटोलींग करत असताना गुप्त बातमीदाराकडून माहीती मिळाली की काही इसम पांढ-या कलरच्या बोलेरो गाडीमध्ये साईनगर मार्गने रवीनगर कडे गुटख्याची वाहतूक करत आहे. सदर माहीती खात्रीशीर असल्याने संबधीत विभागाचे अधिकारी यांचेशी संपर्क करून त्यांचेसह साईनगर भागात मिळालेल्या माहीती प्रमाणे बोलेरो पिकअप हि साई हेरिटेज ,मालू ले आऊट जवळ साईनगर परिसरामध्ये मिळून आल्याने सदर पांढ-या कलरची बोलेरो न्यु वाहन क्र एम.एच.२७/डि. एल/२२९८ गाडीची तपासणी केली केली असता सदर गाडीमध्ये **प्रीमीयम रजनीगंधा पानमसाला,पानबहार पानमसाला,प्रिमीयम पानपराग पानमसाला,हॉट प्रिमियम पानमसाला,विमल पानमसाला,ए वन सुगंधीत तंबाखू,एच-५ सुगंधीत तंबाखू असा विवीध ब्रॅडचा २,०५,३९६ रू. व बोलेरो वाहन क्रं. एम.एच.२७.डि.एल.२२९८ अंदाजे मुल्य १०,००,००० रु असा एकून १२,०५,३९६ रु चा मुददेमाल जप्त करण्यात आला तसेच दोन आरोपी नामे १) सुरज हरीकिशोर लाहोटी वय ३८ वर्ष रा. रवीनगर अमरावती २) भुषन किशोरराव बुब वय ३१ वर्ष रा.रिंग रोड वरूड जिल्हा अमरावती याना ताब्यात घेवून फिर्यादी श्री घनश्याम पंजाबराव दंदे अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन अमरावती यांचे तक्रार वरून पोलीस स्टेशन राजापेठ येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हाचा पुढील तपास सुरू आहे.**

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, नवीनचन्द्र रेडडी सर, मा. पोलीस उपआयुक्त कल्पना बारवकर मॅडम (मुख्यालय), मा.पोलीस उपआयुक्त गणेश शिंदे सर. परिमंडळ क्रं. ०२ ,मा. पोलीस उपआयुक्त सागर पाटील सर,परिमंडळ क्रं. ०१, मा.सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) शिवाजी बचाटे सर, मा. सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भवंर सर, राजापेठ विभाग यांचे मार्गदर्शना खाली युनिटक्रं. ०१ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सपोनि मनीष वाकोडे, पोउपनि प्रकाश झोपाटे, फिरोज खॉन,सतिश देशमूख, सचीन बहाळे,अलीमउददीन खतीब नाईक पोलीस अमंलदार नाझिमउददीन सयैद, विकास गुडदे, पोलीस अमलदार सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक रोशन माहुरे, किशोंर खेंगरे यानी केलेलीआहे.

जनसंपर्कअधिकारी
पोलीसआयुक्तकार्यालय अमरावती शहर